CR2021010705

**राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची प्रभावी अंमलबजावणीबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५३/कोषा प्रशा-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक: ७ जानेवारी, २०२१**

संदर्भ :- १. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो-२०१२/प्र.क्र ९६/सेवा-४, दि.२७.०८.२०१४.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अंनियो-२०२०/प्र.क्र.३७/सेवा-४, दि.०४.१२.२०२०.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या स्तर-१ ची अंमलबजावणी दि.०१.०४.२०१५ पासून करण्याची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांच्या जबाबदाऱ्याही दर्शविल्या आहेत.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर व प्रशासकीय विभागाच्या स्तरावर कामाची जबाबदारी निश्चित केल्यास प्रलंबित प्रकरणांचा निपटारा वेळेत होऊ शकेल. तसेच सर्व स्तरावर उचित समन्वय साधला जाऊन यापुढे सर्व प्रकरणांवर वेळीच कार्यवाही होऊन प्रलंबितता वाढणार नाही. याद्दष्टीने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## शासन परिपत्रक

१) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता संबंधित कार्यालयांचे कार्यालय प्रमुख यांना त्या कार्यालयाकरिता नोडल अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

२) प्रत्येक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या कार्यालयातील, राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत दि.०४.१२.२०२० च्या परिपत्रकातील दिलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत दर तिमाहीला आढावा घ्यावा व वेळोवेळी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत लॉगिन करुन त्यांच्या कार्यालयातील राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची सद्य:स्थिती पहावी व त्यात त्रुटी दर्शविलेल्या असल्यास त्यांचे निराकरण करावे व त्याचा अहवाल त्यांच्या विभाग प्रमुखांस सादर करावा.

३) प्रत्येक विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांतील, राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत दर सहामाही आढावा घ्यावा व त्याचा अहवाल त्यांच्या मंत्रालयीन विभागास सादर करावा.

४) यापूर्वी क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/कोषा-प्रशा-४, दि.७.१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निदेशानुसार प्रत्येक मंत्रालयीन विभागाने उपसचिव वा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेसाठी समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) नेमावा; त्याच्यावर निवृत्तीवेतन निधी व विकास प्राधिकरण (PFRDA), केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण, वित्त विभाग राज्य

समन्वय अधिकारी तसेच राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या सूचना/निर्देश यांचे विभागांतर्गत पालन करुन घेण्याची जबाबदारी राहील. प्रत्येक विभाग प्रमुखाने सादर केलेल्या अहवालावर उचित कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभाग स्तरावरील समन्वय अधिकारी यांची राहील.

५) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा सभासद असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या वेतनातून दरमहा त्यांची वर्गणी व शासनाची कपात होऊन केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे विहीत मुदतीत जमा होत आहे, याची खातरजमा करावी. प्रत्येक सभासदास त्यांच्या "प्रान" खात्यावर जमा असलेल्या रक्कमेचा तपशिल केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाच्या प्रणालीवर उपलब्ध आहे. त्यात काही त्रुटी असल्यास तात्काळ संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी व आहरण व संवितरण अधिकारी यांनी एका आठवडयातच तक्रारीचे निराकरण करावे.

**३.** सदर शासन परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२१०१०७१४४९२२०८०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashok Gulab Chaudhari

Digitally signed by Ashok Gulab Chaudhari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3a31f1e61a49658347833c8c22a09cb8141a51cf08da760fd5e2a1b3c1769153, cn=Ashok Gulab Chaudhari
Date: 2021.01.07 14:52:44 +05'30'

**(अशोक चौधरी)**
**कार्यासन अधिकारी, वित्त विभाग**

**प्रति,**

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. मा. राज्यपाल यांचे सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
६. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई

१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२७. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३०. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२. निवड नस्ती/कोषा प्रशा-४